नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३३७ Issue - 337 | वार शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ Blow- Friday Date 25 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारत कठोर पावले उचलणार

## पहलगाम हल्ला; कुठेना कुठे चूक झाली आहे : किरेन रिजीजु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्र सरकार जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील हल्ल्यानंतर अॅक्शन मोडवर आलं आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानवर निर्बंध घालणारे ५ मोठे निर्णय काल घेतले. त्यानंतर लगेच अरबी समुद्रात क्षेपणास्त्रांच्या चाचणीला सुरुवात झाली आहे. याशिवाय वायूदलाकडूनही युद्धाचा सराव सुरु करण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. त्यानंतर केंद्र सरकारने या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय बैठक बोलावली. या बैठकीला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यासह इतर पक्षांचे प्रमुख नेते देखील उपस्थित होते.



या बैठकीआधी अमित शाह यांची परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांच्यासोबत महत्त्वाची बैठक पार पडली. त्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीनंतर केंद्र सरकारचं मोठं विधान समोर आलं आहे. कुठेना कुठे चूक झाल्याचं सरकारने कबूल केल्याचं वृत्त सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. याशिवाय किरेन रिजिजू यांचं वक्तव्य देखील आता समोर आलं आहे.

**अरबी समुद्रात क्षेपणास्त्रांची चाचणी आणि वायूदलाचा युद्धाभ्यास सुरू**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील हल्ल्याबाबत केंद्र सरकारकडून मोठं वक्तव्य करण्यात आलं आहे.

पहलगाम हल्ल्यात कुठेना कुठे चूक झाल्याचं सरकारने मान्य केलं आहे. केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी याबाबतचं वक्तव्य केलं आहे. सर्वपक्षीय बैठकीनंतर किरेन रिजिजू यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मोठं वक्तव्य केलं.

आमच्या विविध सुरक्षा यंत्रणांकडून आयबीकडून, गृह मंत्रालयाकडून घटना कशी झाली आणि कुठे चूक झाली याबाबत माहिती देण्यात आली आहे. घटना जिथे घडली ती जागा मुख्य रस्त्यावर घडलेली नाही. तिथे पायी जावं लागतं किंवा घोड्याने जावं लागतं. मुख्य रस्त्यापासून तिथे जाण्यास अडीच तास लागतात. याबाबत सांगण्यात आलं. सर्वपक्षीयांना सांगण्यात आलं की, सर्व काही चांगलं सुरु असताना या घटनेत चूक झाली आहे. या घटनेमुळे सर्व दु:खी आहेत. अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी काय-काय केलं पाहिजे याबाबत अधिकाऱ्यांना सविस्तर सांगितलं आहे, असं किरेन रिजिजू म्हणाले आहेत. दरम्यान, हल्ला घडला तिथे सुरक्षा दलाचा एकही जवान नव्हता असं पर्यटकांनीदेखील माध्यमांसमोर सांगितलं होतं.

सर्वपक्षीय बैठकीनंतर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचीदेखील पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. केंद्र सरकारची आज सर्वपक्षीयांसोबत बैठक झाली. पहलगाममध्ये जी घटना घडली त्यावर सर्वांनी भाष्य केलं. सर्वपक्षीयांनी या हल्ल्याची निंदा केली आहे. सरकारच्या कोणत्याही कारवाईला आमचं समर्थन आहे. काश्मीरमध्ये शांतता ठेवण्यासाठी आणखी चांगले प्रयत्न करावे. तिथे शांतता राखणं जरुरीचं आहे, असा मुद्दा आम्ही मांडला. त्यावर त्यांनी सुद्धा सर्व कारवाई केली जाईल, असं सांगितलं, अशी प्रतिक्रिया खर्गे यांनी दिली.

तर काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनीदेखील प्रतिक्रिया दिली. आमचा सरकारच्या प्रत्येक ॲक्शनला पूर्ण पाठिंबा असेल, असं राहुल गांधी म्हणाले. या सर्वपक्षीय बैठकीत हल्ल्यात जीव गमावणाऱ्या नागरिकांप्रती संवेदना व्यक्त करण्यासाठी २ मिनिटे मौन पाळण्यात आलं.

# हल्लेखोरांना कठोर शिक्षा देऊ; पंतप्रधान मोदींचा दहशतवाद्यांना सज्जड इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मधुबनी (बिहार) : पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील हल्लेखोरांचा पृथ्वीच्या अंतापर्यंत पाठलाग केला जाईल व या दहशतवाद्यांनी तसेच, त्यांच्या सूत्रधारांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देण्यात येईल,' असा सज्जड इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी येथे दिला.



पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यानंतर प्रथमच पंतप्रधानांनी या घटनेवर भाष्य केले. पंचायत राज दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, केंद्रीय ग्रामविकास व पंचायतराजमंत्री राजीव रंजन या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी झालेल्या सभेच्या सुरुवातीस पंतप्रधानांनी उपस्थितांना दोन मिनिटे मौन राखून पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले. 'या निघृण हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांप्रति देशभरातील नागरिक सहवेदना व्यक्त करत आहेत. या मृतांच्या पाठीशी पूर्ण देश उभा आहे. या हल्ल्यात अनेकांनी आपली मुले, भाऊ, पती यांना गमावले. बंगाल, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, ओडिशा, बिहार अशा अनेक प्रांतांतील नागरिकांचा या मृतांमध्ये समावेश आहे. कारगिलपासून कन्याकुमारीपर्यंत आपले दु:ख व आपला आक्रोश एकसारखाच आहे, असे ते म्हणाले.

त्यानंतर त्यांनी पहलगामच्या घटनेवर भाष्य करताना दहशतवादी व पाकिस्तानला इशारा दिला. 'बिहारच्या भूमीवरून मी आज सर्व जगाला सांगू इच्छितो की, या दहशतवादी हल्ल्यात सामील असणाऱ्यांची भारत ओळख पटवेल, त्यांचा माग काढला जाईल व त्यांना तसेच, त्यांच्या सूत्रधारांना शिक्षा करण्यात येईल. आम्ही या सर्वांचा पृथ्वीच्या अंतापर्यंत पाठलाग करू. भारताची देशभावना दहशतवादामुळे मोडून पडणार नाही. दहशतवादाला शिक्षा होईलच,' असे ते म्हणाले. विशेष म्हणजे, हा इशारा त्यांनी इंग्लिशमधून दिला.

'हा हल्ला ज्यांनी घडवून आणला व हल्लेखोरांचे जे सूत्रधार आहेत त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना करण्यात येईल, हे मी स्पष्टपणे सांगत आहे,' असे पंतप्रधानांनी पाकिस्तानचे नाव न घेता ठणकावले. हे भारतीयांची इच्छाशक्ती दहशतवाद्यांच्या आश्रयदात्यांचे कंबरडे मोडेल,' असेही ते म्हणाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांना ५० टक्के आरक्षण लागू करणारे बिहार हे पहिले राज्य ठरल्याबद्दल पंतप्रधानांनी नितीशकुमार यांचे अभिनंदन केले. 'गेल्या १० वर्षांत साडेपाच लाखांहून अधिक सामान्य सेवा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. तसेच, दोन लाख ग्रामपंचायती इंटरनेटद्वारे जोडण्यात आल्या आहेत,' असेही पंतप्रधानांनी नमूद केले. या कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

'या बळी पडलेल्यांना न्याय मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. या मुद्द्यावर संपूर्ण देश ठाम आहे. माणुसकीवर ज्यांचा-ज्यांचा विश्वास आहे, ते आमच्यासोबत आहेत. या हल्ल्यानंतर ज्या-ज्या देशांतील नेत्यांनी तसेच, तेथील नागरिकांनी भारताप्रति पाठिंबा व्यक्त केला, त्यांचे मी आभार मानतो, असेही ते म्हणाले.

# भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणत्याही प्रकारची द्विदेशीय मालिका होणार नाही : बीसीसीआय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्यानंतर आता भारताने पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आहेत. बीसीसीआयने अखेर पाकिस्तानबाबत मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी खेळला पण ते पाकिस्तानात गेले नाहीत. भारत सरकारने भारतीय संघाला पाकिस्तानात जायची परवानगी दिली नव्हती. त्यामुळे भारतीय संघ पाकिस्तानात गेला नव्हता. आता भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानची चांगलीच कोंडी केली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानचे स्वप्न अधुरेच राहणार आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी असताना बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला हे पाकिस्तानात गेले होते. त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात मालिका खेळवायला हवी आणि या मालिका त्रसस्थ ठिकाणी नाही तर त्यांच्याच देशांत व्हायला हव्यात, असे शुक्ला यांनी म्हटले होते. पण आता मात्र शुक्ला यांनी या हल्ल्यानंतर आपल्या भूमिकेत बदल करावा लागला आहे. कारण या हल्ल्यानंतर सर्व चित्र बदलले आहे आणि त्यामुळेच बीसीसीआयने आता एक कठोर निर्णय घेतला आहे.



बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सांगितले की, पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात निष्पाप लोकांचा जीव गेला. या सर्व कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. त्यानंतर आता बीसीसीआयने एक मोठा निर्णय घेतला हे. यापुढे भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणत्याही प्रकारची द्विदेशीय मालिका न खेळवण्याचा मोठा निर्णय आता बीसीसीआयने घेतला आहे. त्यामुळे आता यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात मालिका होणार नाहीत, हे स्पष्ट होत आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात मालिका खेळवण्यात यावी, असे पाकिस्तानच्या आजी-माजी खेळाडूंना वाटत होते. तसे वातावरणही निर्माण करण्यात आले होते. पण त्यानंतर मात्र पहलगाम हल्ल्यानंतर सर्व काही बिघडले आहे आणि त्यामुळे आता भारत पाकिस्तानशी यापुढे कोणताही मालिका खेळणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात जर मालिका झाली तर त्याचा आर्थिक फायदा पाकिस्तानला जास्त होऊ शकतो. त्यामुळे ते ही मालिका खेळवण्यासाठी प्रयत्नशील होते. पण आता यापुढे मालिकाच होणार नसल्याचे समोर आले आहे.

# 'कोणत्याही कारवाईसाठी विरोधकांचा पाठिंबा'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाममधील क्रुर हल्ल्यात २८ पर्यटकांना प्राण गमवावे लागले आहेत. या घटनेचे पडसाद आता देशभर उमटू लागले आहेत. यानंतर केंद्र सरकारने आज पहलगाम घटनेवर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीला सत्ताधारी मंत्री आणि खासदारदारांसह विरोधकही उपस्थित होते. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी म्हटले 'सरकारला कोणतीही कारवाई करण्यासाठी पूर्ण पाठिंबा असेल.'

आज सायंकाळी सर्वपक्षीय बैठक पार पडली. यावेळी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि गुप्तचर अधिकाऱ्यांनी उपस्थित नेत्यांना घटनेसंदर्भात तसेच भविष्यातील निर्णयाबाबत माहिती दिली. बैठक पार पडल्यानंतर राहुल गांधींनी सरकारला योग्य ती कारवाई करण्यासाठी पाठिंबा दर्शवला आहे. गांधी म्हणाले, सर्वांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे.



सरकारला कोणतीही कारवाई करण्यासाठी विरोधी पक्षाने पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे.

कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेनीही जम्मू आणि काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न आवश्यक असल्याचे म्हटले आहे. खर्गे म्हणाले, ' संरक्षण मंत्री राजनाथ सिंहांच्या नेतृत्वात बैठक पार पडली, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देखील उपस्थित होते. सर्व पक्षांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. आम्ही म्हटले की, जम्मू आणि काश्मीरमध्ये शांतता राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत...

दरम्यान तृणमुल काँग्रेसचे खासदार सुदीप बंडोपाध्याय यांनी नमूद केले की, 'दहशतवादाविरुद्धच्या लढाईत आम्ही सरकारसोबत आहोत. देशाने एकजुटीने याचा सामना केला पाहिजे. सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुखांनी पंतप्रधानांना संदेश दिला आहे.'

भारताचे मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखले जाणाऱ्या निसर्गरम्य अशा पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. ज्यामध्ये २६ जणांना आपला प्राण गमवावा लागला आहे. यानंतर देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. भारत सरकारने पाकिस्तानला प्रत्युत्तर म्हणून कठोर पाऊलं उचलली आहेत. भारत पाकिस्तानमधील सिंधू जल करार रद्द करण्यात आला आहे. तसेच पाकिस्तानी नागरिकांना व्हिला बंद करण्यात आला आहे आणि अटारी-वाघा बॉर्डर सुद्धा बंद करण्यात आलं आहे. परिणामी भारत पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले आहेत.

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा आढावा**

**विकासकांच्या अडचणी तात्काळ सोडविण्याचे निर्देश**

# सौर उर्जा प्रकल्पातील विकासकांसाठी जिल्हास्तरावर टास्क फोर्स : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणारा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा राज्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. २०२५ वर्षात सात हजार मेगावॅट सौर उर्जा निर्मितीचे उद्दिष्ट आहे. राज्यातील विकासकांना १०० दिवसाला ६९० मेगावॅटचा लक्ष्यांक केंद्र सरकारने दिलेला असताना ७४६ मेगावॅट सौर उर्जा निर्मिती करण्यात आली असून यामध्ये दिलेल्या मुदतीपेक्षा अगोदर लक्ष्यांक पूर्ण केला आहे. मात्र अजूनही काही ठिकाणी विकासकांना वन, पर्यावरण, सुरक्षेबाबतच्या अडचणी असल्याने त्या सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर टास्क फोर्स तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ संजीव कुमार, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ राधाकृष्णन बी. यांच्यासह सौरऊर्जा कंपनीचे राज्यातील प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सौर उर्जा प्रकल्पामध्ये महाराष्ट्राने देशात सर्वोत्कृष्ट काम केले आहे. विकासकांना जिल्हास्तरावर येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स तयार करून जिल्हाधिकाऱ्यांसोबत पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिन्यातून एकदा बैठक घेवून प्रशासकीय व तांत्रिक अडचणी सोडवाव्यात. आदिवासी शेतकऱ्यांना सौर कृषी उर्जा प्रकल्पाचा लाभ मिळण्यासाठी त्यांना देण्यात आलेले वनपट्टे कायदेशीर होण्यासाठी वन विभागाने प्रयत्न करावेत. हा इको फ्रेंडली प्रकल्प असल्याने वन जमीन इतर कामासाठी वापरण्यास देण्याबाबत आणि शेतकऱ्यांच्या भल्याचा विचार करून वन आणि पर्यावरण विभागाने तसा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सप्टेंबर २०२६ अखेर सर्व सौर उर्जा फीडरचे काम होण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय यंत्रणा, उर्जा विभाग, सौर उर्जा विकासक यांचे अभिनंदन केले.

**प्रकल्पात अडचणी आणल्यास थेट कारवाई**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. गुंड प्रवृत्तीचे लोक कामात अडचणी आणत असल्यास त्यांच्यावर थेट कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

**ग्रामपंचायतीच्या 'ना हरकत' ची गरज नाही**

सौर उर्जा प्रकल्पासाठी गावातील खासगी किंवा शासकीय जमिनीबाबत राज्य शासनाने ना हरकत दिली असल्याने पुन्हा (पान २ वर....)

## संपादकीय....

### पंतप्रधानांचा इशारा

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील हल्लेखोरांचा पृथ्वीच्या अंतापर्यंत पाठलाग केला जाईल व या दहशतवाद्यांनी तसेच, त्यांच्या सूत्रधारांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देण्यात येईल,' असा सज्जड इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच बिहार येथे दिला. पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यानंतर प्रथमच पंतप्रधानांनी या घटनेवर भाष्य केले. पंतप्रधानांनी उपस्थितांना दोन मिनिटे मौन राखून पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले. 'या निघृण हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांप्रति देशभरातील नागरिक सहवेदना व्यक्त करत आहेत. या मृतांच्या पाठीशी पूर्ण देश उभा आहे. या हल्ल्यात अनेकांनी आपली मुले, भाऊ, पती यांना गमावले. बंगाल, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, ओडिशा, बिहार अशा अनेक प्रांतांतील नागरिकांचा या मृतांमध्ये समावेश आहे. कारगिलपासून कन्याकुमारीपर्यंत आपले दुःख व आपला आक्रोश एकसारखाच आहे, असे ते म्हणाले. 'बिहारच्या भूमीवरून मी आज सर्व जगाला सांगू इच्छितो की, या दहशतवादी हल्ल्यात सामील असणाऱ्यांची भारत ओळख पटवेल, त्यांचा माग काढला जाईल व त्यांना तसेच, त्यांच्या सूत्रधारांना शिक्षा करण्यात येईल. आम्ही या सर्वांचा पृथ्वीच्या अंतापर्यंत पाठलाग करू. भारताची देशभावना दहशतवादामुळे मोडून पडणार नाही. दहशतवादाला शिक्षा होईलच,' असे ते म्हणाले. विशेष म्हणजे, हा इशारा त्यांनी इंग्लिशमधून दिला.

# पंढरपुरात सकल जैन समाजाचा मूकमोर्चा

## पहलगाम हल्ला व विलेपार्ले येथील जैन मंदिराचे पाडकामप्रकरणी निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी

जैन धर्म आणि समाजावर होणाऱ्या अन्याय व अत्याचारा बाबत आणि पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी पंढरपूर शहर आणि तालुका सकल जैन समाजाच्यावतीने निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.





दिनांक १६/०४/२०२५ रोजी विलेपार्ले, मुंबई येथील जैन मंदिर चुकीच्या पद्धतीने व बेकायदेशीर पद्धतीने आणि सर्व बाबी समजून न घेता अत्यंत क्रूर पद्धतीने बीएमसी (बृहन्मुंबई महानगरपालिका) द्वारा जेसीबी च्या सहाय्याने उध्वस्त करण्यात आले. सदर मंदिर पाडताना तेथील धार्मिक ग्रंथ,पूजा साहित्याची विटंबना करण्यात आली तसेच मंदिरातील प्रतिष्ठित मूर्ती भंग करण्यात (तोडण्यात) आली.

प्रशासनाच्या या जुलमी कार्यामुळे देशातील समस्त जैन धर्मीय व सर्व शांतताप्रिय नागरिक अत्यंत आक्रोशीत झाले आहेत. सदरच्या झालेल्या घटनेस जे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी होऊन त्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी आणि सदर उध्वस्त केलेल्या मंदिराचे त्याच जागेवर पुनर्निर्माण करण्यात यावे.तसेच गेल्या अनेक वर्षा पासून जैन धर्माच्या तीर्थ स्थळावर अतिक्रमण करणे ,यात्रेकरूंवर हल्ला करणे, जैन मुनी साध्वीं वर हल्ला करणे व जाणिवपूर्वक त्रास देणे असे प्रकार सुरु आहेत.या मागे कुणाचा कुटिल हेतू आहे त्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

जैन समाज हा अल्पसंख्यांक असून अहिंसावादी व शांतताप्रिय असतांना सुद्धा काही राजकीय पक्षाचे प्रतिनीधी जैन धर्माबद्दल निंदनीय,आक्षेपार्ह भाषा वारंवार वापरतात त्यावर कठोर कार्यवाही करावी . तसेच पहेलगाम जम्मू काश्मिर येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्या निरपराध नागरिकांना न्याय देण्यासाठी शासनाच्यावतीने पावलं उचलली आहेतच तरीही अतिरेक्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी सकल जैन समाजाच्या वतीने करण्यात आली.

या मागण्यांचे निवेदन पंढरपूर तहसिलदार सचिन लंगुटे यांना सकल जैन समाजाच्या वतीने देण्यात आले.या मूक मोर्चासाठी पंढरपूर पोलिस प्रशासनाच्यावतीने सहकार्य लाभले.यावेळी पंढरपूर शहर , सरकोली, देगाव,जैनवाडी,करकंब,मेडलिंब,कवठाळी, धोंडेवाडी या ठिकाणाहून समाजबांधव उपस्थित होते.

## सौर उर्जा प्रकल्पातील विकासकांसाठी जिल्हास्तरावर....

(पान १ वरून..)

ग्रामपंचायतीच्या 'ना हरकत' प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. याबाबत सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योग्य कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

यावेळी विकासकांनी मांडलेल्या समस्या, अडचणी समजून घेवून जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या.

**खासगी जमीन घेतानाही मुद्रांक शुल्क माफ**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पासाठी सरकारी जमिनीसाठी सरकारने मुद्रांक शुल्क माफ केले आहे. आता खासगी जमीन घेतानाही मुद्रांक शुल्क माफ करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**आतापर्यंत २ लाख १४ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा**

सौर उर्जा योजनेच्या अंतर्गत राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्याच्या आधारे सर्व कृषी फीडर चालविण्यात येणार आहेत. राज्यात १५ हजार २८४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे काम चालू आहे. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचा हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. आतापर्यंत राज्यात १३५९ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प पूर्ण झाले असून त्यामुळे २ लाख १४ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होऊ लागल्याची माहिती अपर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला यांनी सादरीकरणात दिली.

**प्रकल्प व्यवस्थापन पोर्टलचे अनावरण**

सौर कृषी वाहिनी योजना प्रकल्प विकासकांना परवाने देण्यापासून ते वीज निर्मिती बिलांच्या पेमेंटपर्यंत सर्व कामांची प्रभावीपणे देखरेख करता यावी. यासाठी महावितरणच्या सोलर ग्रो कंपनीने 'प्रकल्प व्यवस्थापन पोर्टल' विकसित केले आहे. पोर्टलचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. हे पोर्टल महावितरण, महापारेषण, महाऊर्जा, विद्युत निरीक्षक, सोलार ग्रो कंपनी, सर्व सौर ऊर्जा प्रकल्प विकासकांना उपलब्ध आहे. अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर करावयाची कार्यवाही, घ्यावयाची दक्षता व आवश्यक मार्गदर्शन करण्यास ते सक्षम आहे. ज्यामुळे नियोजित सर्व प्रकल्प विक्रमी काळात पूर्ण होण्यास व व्यवस्थापनाची कामे वेळेत आणि सुरळीत होण्यास मदत होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## किरकोळ वादातून तरुणावर कोयताने हल्ला

सोलापूर : गोंधळी वस्ती येथे किरकोळ कारणावरून तरुणावर तिघांनी कोयत्याने हल्ला केल्याची घटना मंगळवारी घडली.याप्रकरणी सिद्धेश्वर परशुराम भिसे (वय-२७,रा.न्यू शिवाजी नगर,गोंधळी वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून विशाल पाचंगे,अनिल पाचंगे,शंकर भिसे (रा. गोंधळी वस्ती,न्यू शिवाजी नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात मिळालेली माहिती अशी की,यातील संशयित आरोपी विशाल पाचंगे यांचे टीव्ही केबल वायर तुटल्याच्या कारणावरून फिर्यादीस संशयित आरोपींनी मिळून शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी

मारहाण केली.तसेच विशाल पाचंगे याने कोयत्याने व फिर्यादीच्या अत्याचा मुलगा मयूर वाघमोडे याला डोक्यात मारून जखमी केले.संशयित आरोपी शंकर भिसे याने छोटा हत्ती चारचाकी वाहन (क्रमांक एम एच १३ ए एन ७६९१) याच्या पुढील काचेवर दगड मारून वाहनाचे नुकसान केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या तरतूदीस प्रशासकीय मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या कामासाठी २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या खर्चाच्या तरतूदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत चौथी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रकल्पामुळे नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील १ लाख ९६ हजार सहाशे हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

गोसीखूर्द राष्ट्रीय प्रकल्प हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्याद्वारे राबविण्यात येत आहे. गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा उपखोऱ्यात वैनगंगा नदीवर गौसीखुर्द (ता.पवनी) येथे हा बहुउद्देशीय प्रकल्प साकारण्यात येत आहे.

सिंचन, पिण्यासाठी पाणी, औद्योगिक पाणी पुरवठा व मत्स्यव्यवसाय व जलविद्युत निर्मिती असा हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पातून खुले कालवा वितरण, उपसा सिंचन व बंदिस्त नलिका वितरण या पद्धतीने नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांतील सिंचन क्षेत्राला लाभ होणार आहे.

हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट आहे. पूर्व विदर्भातील हा मोठा व महत्वाचा राष्ट्रीय प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यादृष्टीने या प्रकल्पाच्या खर्चास चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणून आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

## हिंगणघाट शहरातील कामगारांना घर मिळवून द्यावे : गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरात सुत गिरण्यांसह काही उद्योगधंदे आहेत. त्यामुळे शहरात रोजगारासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्याही अधिक आहे. कामगारांना परवडणाऱ्या किमतीमध्ये हक्काचे घर दिल्यास त्यांची मोठी सोय होणार आहे. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपळगांव येथे अत्यल्प उत्पन्न गटाकरीता बांधण्यात आलेली घरे कामगारांना उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

पिंपळगांव (ता. हिंगणघाट जि. वर्धा) येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटाकरीता सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. यापैकी विक्री न झालेल्या सदनिकांबाबत मंत्रालयात गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी बैठक आयोजित केली होती. यावेळी मुख्य अभियंता शिवकुमार आडे, उपसचिव अजित कवडे, अवर सचिव रवींद्र खेतले आदी उपस्थित होते.

पिंपळगांव येथील सदनिकांची रंगरंगोटी करावी. त्यानंतर सदनिकांची परवडणाऱ्या किमतीला विक्री करावी. कामगारांना घरे देण्यासाठी हिंगणघाट शहरातील उद्योजकांचे सहकार्य घ्यावे. कामगारांना घर खरेदी करण्यासाठी मिळणारे अनुदान, त्यांच्यासाठी असणाऱ्या योजना याबाबत पडताळणी करावी. त्यानुसार कामागरांना घर खरेदी करून देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचनाही राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्या. बैठकीत पिंपळगांव येथील सदनिकांबाबत राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.



**मंत्रालयात विविध विषयांबाबत बैठकीचे आयोजन**

**अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ**

# अन्न व औषध प्रशासनात दक्षता आणि गुप्त वार्ता विभाग स्वतंत्र करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भेसळयुक्त अन्न शोधून त्यावर कारवाई करीत सामान्य नागरिकांचे आयुष्य निरोगी ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग सातत्याने काम करतो. त्यामुळे विभागाचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्न व औषध प्रशासन अधिक बळकट करण्यासाठी दक्षता आणि गुप्त वार्ता विभाग स्वतंत्र करावे, त्यासाठी मनुष्यबळ नियुक्त करण्यात यावे, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिले.

मंत्रालयात अन्न औषध प्रशासन विभागाच्या विविध विषयांबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मंत्री श्री.झिरवळ बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव अनिल अहिरे, सहआयुक्त (विधी) दा. रा गहाणे, सह आयुक्त ( अन्न ) उल्हास इंगवले, कक्ष अधिकारी साईनाथ गालनवाड आदी उपस्थित होते.

गुप्त वार्ता आणि दक्षता विभागात पदानुसार कामकाज वाटप करावे. स्वतंत्र विभाग केल्यामुळे कामकाज गतिमान होऊन आलेल्या तक्रारींवर विनाविलंब कारवाई करणे सोपे होईल. तसेच नॉलॉग



पनीर बाबत केंद्र शासनाच्या अधिसूचनेप्रमाणे कारवाई करावी. या पनीर संदर्भात विशिष्ट वजन आणि आकार असावा, अशा सूचनाही मंत्री श्री.झिरवळ यांनी दिल्या.

**१ मे २०२५ पासून नव्या अटींची अंमलबजावणी**

## दिव्यांग उमेदवारांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र अनिवार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाने २७ जून २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व दिव्यांग उमेदवारांना केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरून वितरित होणारे दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी कार्ड) अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व भरती प्रक्रियेत १ मे २०२५ पासून करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीत दिव्यांग उमेदवारांसाठी त्यांच्या खात्यात युडीआयडी कार्ड क्रमांक नोंदविण्याची व त्यास स्वावलंबन पोर्टलवरून वैधता (तरश्रळवरंळेप) मिळविण्याची सुविधा आधीच उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उमेदवारांकडे जर स्वावलंबन पोर्टलचे दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड दोन्ही असतील, तर ते तपशील खात्यात नोंदवणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि राज्य शासनाच्या एसएडीएम पोर्टलवरुन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे. अशा उमेदवारांनी एसएडीएम प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (एपीश्राशपीं छींलशी) अनिवार्य असेल तथापि उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल. उमेदवाराचे नाव, दिव्यांगत्वाचा प्रकार, स्थिती इत्यादी तपशील पडताळल्यानंतरच माहिती वैध ठरवली जाईल. खात्यातील आणि युडीआयडी कार्डवरील जन्मदिनांक एकसारखे असणे आवश्यक आहे.

कोणत्याही जाहिरातीसाठी अर्ज करताना दिव्यांग तपशील वैध असल्याशिवाय अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे सर्व दिव्यांग उमेदवारांनी ही प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण करावी, असे आवाहन आयोगाने केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने रिक्षातील बॅटरी पळविली

सोलापूर : सिव्हिल हॉस्पिटल बी ब्लॉक येथे पार्क करून ठेवलेली रिक्षातील बॅटरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बुधवारी घडली.या प्रकरणी विकास कल्लप्पा चव्हाण (वय-२७, रा.घोडा तांडा,कुमठे गाव) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादीचे मामा रवी राठोड सिव्हील हॉस्पिटल येथे ॲडमिट असल्याने त्यांना भेटण्यासाठी गेले.यावेळी अज्ञात चोरट्याने याच संधीचा फायदा घेऊन साडेपाच हजार रुपये किमतीची एक्साईड कंपनीची १२ क्षम तेची बॅटरी रिक्षामधून काढून चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.




# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात शासकीय जमिनीचे वाटप...

## शासकीय जमिनीवर सौर प्रकल्प उभा करण्यास कोणीही अडथळा न करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अन्वये महावितरण कंपनीस शासकीय जमिनी ह्या ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात आलेले आहेत. ह्या योजनेच्या अनुषंगाने असे निदर्शनास येत आहे की, स्थानिक पातळीवर महावितरण कंपनीस व अंतर्गत एजन्सी यांना काम करताना स्थानिक लोक, ग्रामस्थ, स्थानिक पत्रकार, सोशल मिडीया पत्रकार काम करण्यास अडथळा निर्माण करीत असलेचे महावितरण कंपनी व संबंधित एजन्सीकडून माहिती प्राप्त झाली आहे.

तसेच काही ग्रामस्थांनी ग्रामपंचायत / ग्रामसभा ठराव दिलेला नसलेने प्रकल्प उभा करणेत येऊ नये, अशा प्रकारची मागणी करीत आहेत. विशेषतः माढा (माळ-गाव, भेड, वडोली), सांगोला (कटफळ), बार्शी (सर्जापूर, झाडी), अक्कलकोट (बादलकोट) येथील ग्रामस्थांचा सदर प्रकल्पास विरोध करीत असलेबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (स्था.) स्थापत्य विभाग, सोलापूर यांनी बैठकीमध्ये नमूद केले आहे.

तथापि, सदर प्रकल्प मा. मुख्यमंत्री महोदय यांचा (फ्लॅगशिप) प्रथम प्राधान्याचा विषय असलेने स्थानिक ग्रामस्थांकडून विरोध होत असल्यास प्रथम लोकांना / ग्रामस्थांना याबाबतचे पर्यावरणीय फायदे, क्रॉस सबसिडीचा पडणारा भार, आणि विशेषतः शेतक-यांनाच फायदा होणार आहे. आणि प्रकल्प उभारल्यानंतर दरवर्षी अनूदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच शासनाचे महत्वाचे फ्लॅगशिप योजना असलेने पूर्ण करणेबाबत सुचना दिलेले आहेत.

तरी सर्व ग्रामस्थ / स्थानिक पत्रकार / सोशल मिडीया पत्रकार यांना कळविणेत येते की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत महावितरण यांना शासकीय जमीन वाटप करणेत आलेनुसार कोणीही प्रकल्पास विरोध /अडथळा करु नये, अन्यथा यांची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच कोणीही कायदा व सुव्यवस्था हातात घेवू नये. जर प्रकल्पाबाबत काही विचारणा करावयाची असल्यास तालुका स्तरावरील तहसिलदार / उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयास व महावितरण कार्यालयास विचारणा करावी. प्रकल्पाचे काम करणा-या यंत्रणेस अडचण निर्माण करु नये. अन्यथा यांची गंभीर दखल घेण्यात येईल. असे आवाहन करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या प्रकल्पास विरोध अडथळा निर्माण केल्यास अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास संबंधितावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

# नागरिकांच्या वतीने विठ्ठलराव बदोले यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी :दि. २३ रोजी कसगी गावचे त्यांचे सलग पाचव्या वेळी विठ्ठल साई सहकारी साखर कारखाना मुरूमच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल कसगी ता. उमरगा गावच्या नागरिकांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आले.



विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीच्या टप्प्यापासून आजतागायत सतत मार्गदर्शक संचालक म्हणून ते काम करत असतात.

विकासापासून वंचित असलेल्या उमरगा तालुका, साखर कारखान्याची निर्मिती करून शेतकरी बांधवांच्या मदत करणे हेतू, तसेच तालुक्यातील लोकांच्या हाताला काम मिळावे या उदात्तहेतूने या कारखान्याची उभारणी करण्यात आली. अनेक संकटातून मार्ग काढत मागील २५ वर्षापासून तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत करण्याचे काम विठ्ठल साई च्या माध्यमातून झाले आहे. म्हणून

कसगी गावचे ग्रामपंचायत सदस्य मल्लिनाथ वसंत बोरुटे आयोजित या नागरी सत्काराला गावातील शेतकरी तरुण मित्र उपस्थित होते.

यावेळी संचालक पदी निवड झाल्यामुळे मल्लिनाथ बोरुटे ग्राम पंचायत सदस्य यांच्यावतीने शाल श्रीफळ फेटा देऊन सत्कार करण्यात आले.

याप्रसंगी महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शशिकांत चनपटने गुरुजी, उपाध्यक्ष दिगंबर भोस-ले, माजी अध्यक्ष सुधाकर नंदर्गे,भीमाशंकर बोरूटे, रवी मनगुळे, विजय कलशेट्टी, बनगीशा मकानदार, शिवानंद शाणप्पा सुंटनुरे , शिवानंद रेवणप्पा सुंटनुरे माणिक सुंटनुरे ,नागेंद्र पाटील, श्रीधर गुरव,

माजी ग्रामपंचायत सदस्य मनोहर लिंबाजी नवले व प्रकाश बदोले, शिवनागय्या स्वामी, दत्तूसिंग ठाकूर ,सुखदेव गुरव, सुभाष गुरव, रमेश चनपटणे, रामेश्वर मुलगे,निळु गायकवाड,गवडा पाटील, नागेंद्र पाटील या सर्व नागरिकांच्या उप-स्थितीत नागरी सत्कार करण्यात आले.

# गोपाळपुर येथे कायदेविषयक शिबीर संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुका विधी सेवा समिती, व पंढरपूर अधिवक्ता संघ यांच्या संयुक्त विदयमाने किमान समान शिबीराअंतर्गत गोपाळपुर ग्रामपंचायत (ता.पंढरपूर) येथे तालुका विधीसेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश डी. एन. सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सह दिवाणी न्यायाधीश ए. ए. खंडाळे, पंढरपूर यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी न्यायाधीश ए. ए. खंडाळे, यांनी उपस्थित ग्रामस्थांना कायदेविषयक जनजागृती करुन त्यांना त्यांच्या हक्का विषयी मार्गदर्शन केले. तसेच ॲड. आर.ए. पुजारी यांनी गावक-यांना बाल मजुर कायदेविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

तत्पुर्वी कायदेविषयक शिबीराची प्रस्ताविका अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. आर. बी. चौगुले यांनी केले, तर सुत्रसंचालन अधिवक्ता संघाचे सचिव ॲड. ए.एम. देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे आभार ॲड. गणेश चव्हाण यांनी मानले.

सदर शिबीरास वकिल संघाचे सदस्य ॲड. शितल असबे, ॲड. एम. ए. नळे, तसेच विधी स्वयंसेवक, ॲड. वाघमारे, नंदकुमार देशपांडे, सुनील यारगट्टीकर, पांडुरंग अल्लापुरकर, तसेच न्यायालयीन कर्मचारी व ग्रामस्थ मोठया संख्येने उप-स्थित होते.

# सूर्य आग ओकतोय! ब्रम्हपुरी सर्वाधिक उष्ण, अकोल्यात पारा ४५ पार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंद्रपूर: विदर्भात चंद्रपूर जिल्हातील ब्रम्हपुरीचे आज सर्वाधिक होते. पारा ४५.९ अंशावर पोहचला.अकोला जिल्हावरही सूर्य प्रकोप झाला. अकोल्याचे तापमान ४५.२ अंश होते. या आठवड्यात सलग दोनदा जगातील सर्वाधिक उष्ण शहर ठरलेलल्या चंद्रपूरचा तापमाणात काहीशी घट झाली.चंद्रपूरचे तापमान ४५ अंश होते.चंद्रपूर जिल्हातील काही भागात तापमानाचा पारा वाढलेला असताना काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस बरसला आहे.

चंद्रपूर आणि चंद्रपूर जिल्हात येणारे ब्रम्हपुरीसाठी एप्रिल महिना तापदायक ठरत आहे. या आठवड्यात चंद्रपूर पुन्हा एकदा सर्वाधिक उष्ण शहर ठरले तर एकदा देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद चंद्रपूरच्या नावाने नोंदवल्या गेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात येणाऱ्या ब्रह्मपुरी शहराने आज चंद्रपूरलाही मागे टाकले आहे. विदर्भातील सर्वाधिक तापमान आज ब्रह्मपुरीचे होते. पारा ४५.९ वर पोहचला. मराठवाड्यातही तशीच परिस्थिती आहे. नांदेड, परभणी येथे ४४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर, बीडमध्ये पारा ४३.४ आणि धाराशिव येथे ४२ अंशावर गेला आहे. पुण्यात ४१.२ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आलं आहे. अहिल्यानगर येथे ४०.९, नाशकात ४०.२, तर सोलापुरात ४३.८ इतकं तापमान नोंदवण्यात आलं आहे. मुंबई आणि उपनगरांमध्येही प्रचंड उकाडा जाणवू लागला आहे. खरंतर विदर्भासाठी उन्हाळा नेहमीच तापदायक ठरतो. सूर्य अक्षरश: येथे आग ओकत असल्याचा भास होतो.दुपारच्या सुमारास घराच्या बाहेर जाणे जीवावर येते. ही स्थिती असते मे महिन्यात. मात्र, यावर्षी एप्रिल महिन्यातच ही उष्णता नकोशी झाली आहे. दुपारच्या वेळेस रस्ते ओस पडल्याचे दिसून येत आहे. घरातील कुलर-एसी काम करेना अशी स्थिती उद्भवली आहे. दुसरीकडे, जिल्हातील काही भागात वादळी पावसासह गारपीट झाली आहे. वादळाने अनेक घरांवरील छते उडाली. मार्गांवरील झाडे कोसळली. या पावसामुळे मका, भाजीपाला, मिरची पिकाला मोठा फटका बसला आहे. तर, उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाल्याचं वाटत असलं तरी उकाडा काही कमी झालेला नाही. मे महिन्यात यापेक्षाही भयंकर स्थिती असेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# विधीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ॲड. संदिप कागदे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील ॲड संदिप कागदे यांनी विधीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल या कार्याची दखल घेऊन विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या वतीने ॲड. संदिप कागदे यांना प्रबुद्ध विधीज्ञ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित करण्यात आलेल्या खास कार्यक्रमात ॲड. संदिप कागदे यांना प्रबुद्ध विधीज्ञ राज्यस्तरीय पुरस्कार माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, आमदार अभिजीत पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल सावंत, शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे संस्थापक डी. राज सर्वगोड, नितीन काळे, अध्यक्ष विलास जगधने, सचिव अनिल ननावरे, श्रीकांत चंदनशिवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ॲड. संदिप कागदे यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ग्राहकांची गरज लक्षात घेऊन उत्पादने तयार करणे गरजेचे

## प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांचे प्रतिपादन

# स्वेरीत 'टेक्नोव्हेशन २ के २५' हा उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आयट्रिपलई, मुंबई सेक्शन स्टुडंट ॲक्टीव्हिटी आणि आयट्रिपलई स्टुडंट ब्रँच, स्वेर-ीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (ऑटोनॉमस) यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ एप्रिल २०२५ रोजी स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या तीन विभागांच्या वतीने 'टेक्नोव्हेशन २ के२५' हा उपक्रम तसेच रिझनल आणि ग्रँड फिनाले राउंड संपन्न झाला.

यामध्ये आय ट्रिपलई, मुंबईचे चेअरमन आनंद घारपुरे हे प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार ह्या होत्या. दीपप्रज्वलनानंतर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.सुमंत आनंद यांनी विभागाची माहिती व वाटचाल तसेच संशोधनासाठी मिळालेला निधी, मिळालेली मानांकने आदी बाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांनी या कार्यक्रमाचे स्वरूप, सहभागी विद्यार्थी व प्रोजेक्ट एक्झिबीशन बाबत माहिती दिली. यावेळी आयट्रिपलई, मुंबईचे चेअरमन घारपुरे म्हणाले की, 'ग्रामीण भागात असणाऱ्या गोपाळपूर मधील शिक्षण आणि डॉ. रोंगे सरांचे दिशादर्शक नियोजन यांचे कौतुक वाटते कारण येथील विद्यार्थी शिक्षणाबरोबरच संशोधन करत असतो, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. प्रत्येक दोन-तीन वर्षात तंत्रज्ञानात बदल होत असतो त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतत बारकाईने अभ्यास करून संशोधन करणे गरजेचे आहे. तुमच्या प्रोजेक्टचे रुपांतर प्रोडक्ट मध्ये करा. भारताची लोकसंख्या लक्षात घेता भारतामध्ये बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांची गरज लक्षात घेऊन उत्पादने तयार करणे गरजेचे आहे.' असे सांगितले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे म्हणाले की, 'स्पर्धेत जिंकून पारितोषक मिळविण्यापेक्षा स्पर्धेत व स्पर्धात्मक उपक्रमात सहभागी होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. यामुळे आपला 'आत्मविश्वास वाढतो' असे सांगून विद्यार्थ्यांना प्रत्येक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले. आयट्रिपलईचे सदस्य दत्तात्रय सावंत म्हणाले की, 'आयट्रिपलई च्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे व त्या अंतर्गत असणाऱ्या विविध संधींचा सुयोग्य वापर आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी करावा.' अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार म्हणाल्या की, 'विजेत्यांनी हुरळून जायचे नाही आणि ज्यांचा स्पर्धेत नंबर आला नाही त्यांनी अधिक जोमाने व उत्साहाने पुढील स्पर्धेत सहभागी होवून आव्हान द्यायचे. यातून आपल्याला अनुभव येतो व अभ्यास अधिक होतो.' असे सांगितले. सायंकाळी या उपक्रमाचे पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये राज्यातील विविध महाविद्यालयांतील जवळपास ३५० विद्यार्थ्यांनी ९० प्रकल्प सादर केले होते. यामध्ये विजेत्यांना रोख पारितोषक, प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. यासाठी परीक्षक म्हणून डॉ. रोशन मक्कर, लक्ष्मी घारपुरे, सुमित बुब, चैत्राली पंढरपूरे, हेमंत इंगळे, राजेंद्र सावंत व अमिता कुलकर्णी यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. एस. एस. गावडे व इतर शिक्षक तसेच आयट्रिपलई विद्यार्थी प्रतिनिधी गौरी कुबेर, जय गाडेकर, ऋतुराज कोरे, स्नेहा पिसे, वैष्णवी कदम पाटील यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.एस.पी.पवार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.बादलकुमार, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ. डी. ए. तंबोळी, तसेच तिन्ही विभागांचे प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ.नीता कुलकर्णी व डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



## थोडक्यात...

### वृद्धास तिघांनी केली मारहाण

सोलापूर : होटगी रोड येथे रस्त्यावर चिखल करू नको असे सांगताना तिघांनी वृद्धास मारहाण केल्याची घटना मंगळवारी घडली.याप्रकरणी फारूक गफूर सय्यद (वय-७२, रा.टंगसाल नगर,होटगी रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून मोहसीन डांगे, तौफिक डांगे व अज्ञात एकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादीच्या घराशेजारी राहणारा संशयित आरोपी मोहसीन डांगे हा रोडवर पाणी मारत होता. यावेळी फारुख सय्यद यांनी संशयित आरोपी डांगे याला रस्त्यावर चिखल करू नको असे समजावून सांगत होते. यावेळी संशयित आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत अंगावर धावून आला. संशयित आरोपी तौफिक डांगे यांनी घराबाहेर येऊन फिर्यादीत शिवीगाळ करू लागला. यावेळी फिर्यादीचा मुलगा सय्यद तनवीर हा घराबाहेर आला असता त्याला व फिर्यादीस संशयित आरोपींनी मिळून मारहाण केली.तसेच मोहसिन डांगे याने कोणत्यातरी लोखंडी हत्याराने डोक्यात मारून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# अमरावती, कोल्हापूर, नाशिक आणि सोलापूर येथे नवे प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्र

## अवयवदानास नवे आयाम : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर; अधिकाधिक गरजू रुग्णांना जीवनदान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अवयवदान आणि प्रत्यारोपण प्रक्रियेला अधिक गती, पारदर्शकता आणि परिणामकारकता मिळवून अधिकाधिक गरजू रुग्णांना जीवनदान देता येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

आरोग्य भवन येथे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री श्री. आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली अवयव प्रत्यारोपणविषयी बैठक झाली. यावेळी आमदार श्रीमती देवयानी फरांदे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, वैद्यकीय शिक्षण सहसंचालक डॉ.पल्लवी सापळे, वैद्यकीय अधिकारी, मानवी अवयव प्रत्यारोपण तसेच विधी व न्याय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री.आबिटकर यांनी अमरावती, कोल्हापूर, नाशिक आणि सोलापूर येथे नवे प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्र (नेपरश्र ढीरपीश्रिरपीं उेीवळपरींळेप उशपींशी-नढउउ) स्थापन करण्याच्या सूचना दिल्या. शासकीय रुग्णालयांमध्ये विशेष केंद्रांची निर्मिती आणि त्या ठिकाणी समन्वयकांची नियुक्ती करण्यात येईल. अवयव प्रत्यारोपणासाठी आवश्यक रुग्णालय नोंदणी प्रक्रियेचा तातडीने निर्णय घेण्यात येईल. त्याचबरोबर विभागीय प्राधिकरण समित्यांनी जिवंत अवयव दान परवानगी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याच्याही सूचना मंत्री श्री.अबिटकर यांनी दिल्या.

यावेळी अवयव प्रत्यारोपण करणाऱ्या डॉक्टर आणि समन्वयकांसाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात. 'शासकीय रुग्णालयामध्ये अवयव दानाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागामार्फत चालू करण्यात आलेला फेलोशिप इन क्रिटीकल मेडीसीन' हा पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नियोजन सुयोग्यरित्या करण्यात यावी अशी सूचनाही मंत्री श्री. अबिटकर यांनी दिल्या.

**जिवंत अवयव दान परवानगी प्रक्रिया सुलभ अवयवादात्यांचा महाराष्ट्र दिनी सत्कार**

अवयवदानासाठी जनजागृती, सन्मान व सामाजिक सहभाग असल्याने राज्यभर जागृती मोहीम राबवून जनतेत अवयवदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्याबद्दल मंत्री श्री.आबिटकर यांनी सांगितले. १ मे महाराष्ट्र दिनी, जिल्हास्तरावर अवयवदाते आणि त्यांच्या कुटुंबीयांचा पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात यावा असे त्यांनी यावेळी सांगितले.

अतितातडीच्या परिस्थितीत अवयवदान व शवविच्छेदन प्रक्रियेत समन्वय साधण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याची सूचनाही मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी केली.

# भाळवणीत अज्ञात व्यक्तीच्या कारनाम्यामुळे लाखो रुपयाचे शेतकऱ्यांचे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील भाळवणी शेळवे रस्त्यावरील शेतकऱ्यांचे अज्ञात व्यक्तीकडून पाईपलाईन फोडणे, ऊस जाळणे, बग्यास जाळणे , बोरची मोटर तोडून बोअर मध्ये सोडणे, जनावरांच्या चाऱ्याचा गंजी पेटवून देणे असे प्रकार वारंवार केल्या जात आहेत. अशा विविध कारणामुळे सदर शेतकरी हवालदिल झाले असून रीतसर पोलीस तक्रार करूनही पोलीस कारवाई होत नसल्याने शेतकऱ्याकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पोपट एकतपुरे यांनी केळीच्या पिकांसाठी उसाचे बग्यास आणले होते. सदर बागेस रात्री पेटवून दिले .नंदकुमार कापसे यांच्या शेतातील मकवानाची गंज रात्री पेटवून दिली. जगन्नाथ शिंदे यांच्या शेतातील ऊस पेटवून दिला.

प्रसंग सावधानामुळे पेटलेला ऊस विझवण्यास यश आले. प्रशांत माळवदे यांच्या बोर मधील मोटार, पाईप, केबल, दोरी कट करून मोटार बोर मध्ये सोडली आहे. त्याचप्रमाणे देविदास लिंगे यांच्या शेतातील चेंबर ,सेंचुरी फोडून इतरत्र नेऊन टाकण्यात आली.

दिलीप वाघमारे यांच्या विहिरीवरील मोटार , पाईपलाईन, बोरची पाईप लाईन तोडून टाकण्यात आली. मोहन वाघमारे यांच्या शेतातील मोटारीच्या पेटीला करंट देण्यात आला होता. तसेच ऊसही पेटवून दिला आहे. चंद्रकांत शिंदे यांच्या शेतातील मकवानाची गंज पेटवून दिली आहे.घराजवळ जादू टोना करून लिंबू,सुई, दाबन,खिळे,बाहुल्या टाकल्या जात आहेत.पोलिसांच्याकडे तक्रार केल्यानंतरही गेली एक-दोन दिवसात दिलीप वाघमारे व वैभव वाघमारे यांच्या शेतातील ठिबक, पाईपलाईन ,जळून खाक झाली. रनजीत मदने यांच्या शेतातील चेंबरचे, पाईपलाईन ची फोड करण्यात आली आहे.

**तक्रारी करूनही कारवाई होईना; पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष**

तालुका पोलीस स्टेशन येथे तक्रार देऊनही पोलीस कोणतीही कारवाई करत नसल्याने शेतकऱ्याकडून नाराजी व्यक्त केली जात आहे संबंधित व्यक्तीवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्याकडून केली जात आहे.

# 'कर्मयोगी'च्या निसर्गरम्य प्रांगणात राज्यस्तरीय तंत्र परिषदेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांचे अभियांत्रिकी मधील ज्ञान वृद्धिंगत होऊन त्याला चालना व प्रोत्साहन देण्यासाठी कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालय शेळवे पंढरपूर येथे दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी कर्मटेक २०२५ या राज्यस्तरीय तंत्र परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक व महाविद्यालयाची प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी दिली.




याबाबतची अधिक माहिती देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील म्हणाले की कर्नाटेक २०२५ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग, सिविल व मेकॅनिकल इंजिनिअरिंग, विभागातील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकीच्या ज्ञानावर आधारित विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे.

यामध्ये आयडिया प्रेझेंटेशन, सिहार पोस्टर प्रेजेंटेशन, प्रोजेक्ट एक्झिबिशन ब्रिज मॉडेल मेकिंग इलेक्ट्रॉनिक्स क्विझ सर्किट सोडाकू ग्रीन बिल्डींग इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे विजेत्यांच्या विद्यार्थ्यांसाठी ५० हजार रुपये हुन ची बक्षिसे दिले जाणार आहेत या सर्व स्पर्धा राज्यस्तरीय स्तरावर होतील.

तसेच सदरच्या स्पर्धेमध्ये राज्यातील विविध नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातून जवळपास ५०० म्हणून अधिक विद्यार्थी सहभागी होणारा असून या अभियांत्रिकीच्या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी आपल्या सहभाग नोंदवावा तसेच ऐनवेळी येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध केली आहे याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान कर्मटिक २०२५चे आयोजक डॉक्टर अभय उत्पाद व सहसंयोजक प्रा दीपक भोसले यांनी केले आहे.

# मुंबईच्या वेव्हज् परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योग-क्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (चजण) करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. येत्या २५ ते २७ एप्रिल २०२५ या कालावधीत सायंकाळी ६.०० ते १०.०० या वेळेत रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई या ठिकाणी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड आशिष शेलार यांची असून, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.




या महोत्सवात शुक्रवार दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी पहिल्या पुष्पात सायंकाळी ६.०० वाजता विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे यांचे शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम सादर आहे. तर याच दिवशी उस्ताद शाहिद परवेझ यांचाही शास्त्रीय गायनाचा कार्यकम होणार आहे. शनिवार दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी दुसऱ्या पुष्पात सायंकाळी ६.०० वाजता डॉ. भरत बलवल्ली तसेच विदुषी मंजुषा पाटील यांचा शास्त्रीय गायनाचा कार्यकम होईल. रविवार दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता ज्येष्ठ गायक पं. आनंद भाटे आणि ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. उल्हास कशाळकर यांचे शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

उपरोक्त शास्त्रीय संगीत महोत्सव रसिक प्रेक्षकांसाठी विनामुल्य ठेवण्यात आलेला आहे. विनामुल्य प्रवेशिका रवींद्र नाट्य मंदिर-प्रभादेवी, छत्रपती शिवाजी नाट्य मंदिर दादर आणि यशवंत नाट्य मंदिर-माटुंगा येथे उपलब्ध आहेत.

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सवाचा रसिक प्रेक्षकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

**मित्रच्या नियामक मंडळाची दुसरी बैठक**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश**

# सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूर नियंत्रणासाठी नवीन साठवण तलाव बांधावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मोठ्या धरणाच्या पाणलोट (कॅचमेन्ट) क्षेत्राबाहेरील लघु पाटबंधारे प्रकल्पांचे खोलीकरण करण्याचे व नवीन साठवण तलाव बांधण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र इन्स्टिटयूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन - 'मित्र' या संस्थेच्या नियामक मंडळाची दुसरी बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी नियामक मंडळाचे उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील, आमदार राणा जगजीतसिंह, राजेश क्षीरसागर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तथा 'मित्र'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर होण्यासाठी आवश्यक धोरणे तयार करण्यासाठी उपाययोजना संदर्भात श्री. परदेशी यांनी यावेळी सादरीकरण केले. तसेच महास्ट्राईड प्रकल्प, महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास प्रकल्प आदींचा आढावा घेण्यात आला. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाला सादर करावयाच्या प्राथमिक प्रकल्प अहवालच्या मानक कार्य प्रणालीला(एसओपी) यावेळी मान्यता देण्यात आली. जागतिक बँक आणि बाह्य सहाय्यद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या 'एसओपी'मध्ये दिलेल्या कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे सादरीकरण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.



राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर करण्यासाठी दरवर्षी राज्याचे सकल उत्पन्न (जीडीपी) १४.५ टक्के करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात राज्य आधार सामग्री प्राधिकरण (स्टेट डेटा पॉलिसी) मधून साधन सामग्री तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

**कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार**

शासकीय कामकाजात गतिमानता येण्यासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी मित्र संस्थेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत युनिर्व्हसल 'ए आय' विद्यापीठाशी सामंजस्य करार केला. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा शासकीय कामकाजात वापर वाढविण्यासाठी मित्र व भारतीय प्राद्यौगिक संस्था, मुंबई (आयआयटी मुंबई ), वोआरजीपीडिया यासंस्थेबरोबरही सामंजस्य करार झाला.

# गुणवत्तापूर्ण काम करण्याला प्राधान्य द्यावे : राज्यमंत्री इंद्रनील नाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत अधिक गुणवत्तापूर्ण काम करण्यास प्राधान्य देण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी दिल्या.

सार्वजनिक बांधकाम विभागाची आढावा बैठक मंत्रालयात परिषद सभागृह येथे राज्यमंत्री श्री.नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झाली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात येत असलेल्या सर्व कामांमध्ये दर्जा राखण्यावर संबंधित यंत्रणांनी कटाक्षाने लक्ष द्यावे असे राज्यमंत्री श्री.नाईक यांनी सांगितले. बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागांच्या विविध कामांचा, प्रगतीपथावर असलेल्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.